# मुंबई विद्यापीठ

कुलसचिव यांचे
कार्यालय
फोर्ट परिसर, मुंबई
विद्यापीठ,
मुंबई ४०० ०३२

---

## परिपत्रक

No. REG/ICC/2020-21-15

**विषय : विद्यापीठाच्या शैक्षणिक व प्रशासकिय कार्यात होणा—या दैनदिन तसेच कार्यालयीन खर्चात कपात करण्याबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे विभाग प्रमुख, संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, संचालक, विद्यापीठ उप—परिसरे, विविध प्रशासकिय विभागांचे विभाग प्रमुख, उपकुलसचिव, यांना कळविण्यात येते की, कोविड — १९ या जागतिक महामारीमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे देशभरात टाळेबंदी (Lockdown), लागू करण्यात आली आहे. सदर टाळेबंदी (Lockdown) मुळे निर्माण झालेल्या आर्थिक परिस्थितीमुळे विद्यापीठाच्या उत्पनात घट झाली आहे तसेच विद्यापीठाच्या परीक्षा होवू न शकल्यामुळे सुध्दा उत्पनात घट होण्याची शक्यता आहे त्यामूळे विद्यापीठासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे.

तथापी, सदर आर्थिक संकटाचा सामना करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सुध्दा काटकसरीचे धोरण अवलंबिण्याचे तसेच या अर्थिक वर्षातील तरतुदीमध्ये कपात करण्याचे निर्देशित केलेले आहे त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने आर्थिक बाबी संदर्भात काटकसरीचे धोरण अवलंबिण्याचे ठरविले आहे या अनुषंगाने आपल्या विभागातील खर्चात काटकसर करण्यात यावी तसेच अनावश्यक खर्च टाळावेत. सध्याच्या परिस्थितीत आपल्या विभागातील अतिकालीक भत्ता (Over Time), भोजन भत्ता (Food Allowance), यावरील खर्च विद्यपीठ प्रशासन अदा करु शकणार नाही.

तरी यासंदर्भात सर्व संबधितांनी नोंद घेऊन आपआपल्या विभागातील प्रशासकीय/कार्यालयीन कामकाजाचे नियोजन करुन खर्चात कपात करण्या संदर्भात उपया योजना कराव्यात.

**ठिकाण : मुंबई -४०००३२**
**दिनांक : २४ जून, २०२०**

**(डॉ. विनोद पाटील)**
**प्रभारी कुलसचिव**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी —**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था, संचालक, विद्यापीठ उप—परिसर, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, समन्वयक, आदर्श महाविद्यालये, सर्व प्रशासकिय विभागांचे विभाग प्रमुख, सर्व उपकुलसचिव, सुरक्षा अधिकारी, अभियांत्रिकी विभाग.
स्वीय सहाय्यक १. मा. कुलगुरु २. मा—प्रकुलगुरु ३. मा. कुलसचिव ४. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा ५. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा ६. संचालक, प व मु मंडळ.